| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. २७७५/२०१४ |
| सरकार -वि- मजहर व ईतर |
| निशाणी क्र. २१ |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | प्रदिप मधु अतुलकर, |
| **वय** | : | ४६ वर्षे, |
| **धंदा** | : | सहा.पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, नागपूर युनीट |
| **राहणार** | : | नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत-**

मी १५,०१.२०१४ ते सन २०१८ पर्यंत गुन्हे शाखा युनीट-४, नागपूर येथे सहा.पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. दिनांक ०३.०७.२०१४ रोजी माझ्याकडे अपराध क्र.१८२/२०१४, कलम ३९२, ३४ भादंवि, पो.स्टे. नंदनवन, तपासाकरीता सोपविण्यात आला. सदर गुन्हयातील तपासासाठी मला छापील प्रथम खबर, घटनास्थळ पंचनामा व घटनास्थळ जप्तीपंचनामा मिळाले. सदर घटनास्थळ जप्तीपंचनामा हे चोरीचे वाहन हिरो होंडा पॅशन नोंदणी क्र. एमएच-३१/डीआर -- बाबतचा होता. सदर कागदपत्र नंदनवन पोलीस स्टेशन यांच्याकडून पत्र देवून हस्तगत केले होते. सदर पत्राची कार्बनप्रत दोषारोपपत्रासोबत दाखल आहे. सदर पत्र दिनांक ०३.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २२** देण्यात येते.

२. त्यानंतर मी पुढील तपासात आरोपी क्र.१ शेख मजहर अहमद यास ताब्यात घेतले. त्यानंतर मी आरोपी क्र.१ चा कबुलीजवाब पंचांसमक्ष नोंदविला. आरोपी क्र.१ ने आपल्या कबुलीजवाबात असे सांगितले की, त्याने व आरोपी क्र.२ यांनी बेला या गावातुन एक निळया रंगाची

पॅशन प्रो मोटारसायकल चोरी केली. तसेच त्याने असाही कबुलीजवाब दिला की, उज्वलनगर, नागपूर या ठिकाणाहून एक मुलगा फोनवर बोलत असतांना त्याचा फोन हिसकावला व त्यानंतर तो फोन त्याने दिपक साहू याला विकला होता. त्याने आपल्या कबुलीजवाबात दिपक साहू याच्या घरी घेऊन जातो असे सांगितले. आता मला कबुलीजवाब दिनांक ०३.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २३** देण्यात येते.

३. त्यानंतर मी गुन्हे शाखेच्या कार्यालयात दिपक साहू यास बोलावून त्याच्याकडून सदर गुन्हयातील मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल मॉडेल क्र. बोल्ड ए०६८ पंचासमक्ष जप्त केला व त्याबाबत जप्तीपत्रक भरुन घेतला. आता मला जप्तीपंचनामा दिनांक ०३.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, दिपक साहू व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २४** देण्यात येते. त्यानंतर मी दिपक साहू याचा जवाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला.

४. त्यानंतर मी आरोपी शेख मजहर यास दिनांक ०३.०७.२०१४ रोजी अटक केले. आता मला अटक फार्म दिनांक ०३.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. तसेच त्याचा अटकसाना भरुन घेतला. आता मला अटकसाना दिनांक ०३.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

५. त्यानंतर मी आरोपी अरशद नदीम यास दिनांक ०४.०७.२०१४ रोजी अटक केले. आता मला अटक फार्म दिनांक ०४.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते. तसेच त्याचा अटकसाना भरुन घेतला. आता मला अटकसाना दिनांक ०४.०७.२०१४ आता मला

दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते.

६. त्यानंतर मी दिनांक ०४.०७.२०१४ रोजी जप्त मुद्देमाल ओळखण्याचा पंचनामा फिर्यादीच्या घरी जाऊन केला. त्यावेळी फिर्यादीच्या घरी त्याची आई सौ. सरीता सोळंकी हजर होती. त्यांनीच जप्त केलेला मोबाईल हा फिर्यादीचा असल्याचे दोन पंचासमक्ष ओळखले व मी त्याबाबत पंचनामा केला. आता मला मुद्देमाल ओळखपंचनामा दिनांक ०४.०७.२०१४ आता मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, सौ. सरीता सोळंकी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात येते. त्यानंतर मी सौ. सरीता सोळंकी व ईतर साक्षीदारांचे जवाब त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदविले. आरोपींविरुध्द सबळ पुरावा असल्यामुळे न्यायालयात सदरचे दोषारोपपत्र दाखल केले. जप्त मोबाईल मला आता दाखविल्यास मी ओळखू शकतो. घटनेला अनेक वर्ष होउन गेल्यामुळे मी आरोपींना ओळखू शकत नाही. न्यायालयासमोरील आरोपी हे तेच आरोपी आहेत की नाही हे मी सांगू शकत नाही.

**उलट तपास आरोपींतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ वाय. बी. मंडपे यांचेमार्फत**

७. मी फिर्याद वाचली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये घटनेच्या वेळी आरोपी कसे दिसत होते याबाबत कोणताही तपशील दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची मोटारसायकल आरोपींकडून जप्त झाली नाही. जप्त मोबाईल कोणाचा होता याची खात्री करण्यासाठी जप्त मोबाईलचे बील तपासादरम्यान घेतले नाही. पंचांना बोलविण्यासाठी कोणतेही समन्स दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कबुली जवाब तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतेही कबुलीजवाब दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्तीपंचनामा निशाणी २४ तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा मुद्देमाल ओळख पंचनामा निशाणी २९ तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पंच हे माझे नेहमीचेच पंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द कोणताही साक्षपुरावा नसतांना मी खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल

केले. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्हयातील खरे आरोपी न मिळाल्यामुळे मी आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा गुन्हा नोंदविला व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.01.12 15:11:19 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०१.२०२६